# लोकमान्य टिळक यांची चतु:सूत्री
# शोधनिबंधाची रूपरेषा

**डॉ. रंजना पाटील**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (मराठी विभाग) मो. नंबर: ७७९८०२०५४१
E-Mail: patilranjana590@gmail.com

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी उल्लेखनीय, वैशिष्ट्यपूर्ण व भरीव कामगिरी केली. त्यांमध्ये लो. टिळक यांचे नाव सर्वार्थाने घेतले जाते. स्वराज्याचे उद्‌गाते, भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे शिल्पकार व युगपुरूष म्हणून ओळखले जाणारे, लो. टिळक यांचे व्यक्तिमत्व अष्टावधानी होते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी लो. टिळकांनी चतु:सूत्रीचा शस्त्रासारखा वापर केला. अशा त्यांच्या जीवनातील अनेक घटनांचा परामर्श 'लोकमान्य टिळक यांची चतु:सूत्री' या शोध निबंधातून घेतलेला आहे. –

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

१) लो. टिळक यांचे चरित्र अभ्यासून त्यातून प्रेरणा घेता येईल.
२) लो. टिळक यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू सांगता येतील.
३) लो. टिळक यांच्या चतु:सूत्रीद्वारे स्वराज्याविषयी परामर्श घेता येईल.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या सिंहगर्जनेतून लो. टिळकांचे नाव डोळ्यासमोर येते. त्याचप्रमाणे त्यांच्या 'स्वराज्य', 'स्वदेशी', 'बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण' या चतुसूत्रींचे स्मरण होते. लोकजागृतीचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, समाजसेवेची इच्छा मनात बाळगणाऱ्या रत्नागिरीच्या खाणीतील या अनमोल रत्नाचे पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक हे होय. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी 'रत्नागिरी' जिल्ह्यातील 'दापोली' तालुक्यातील सृष्टिसौंदर्याने नटलेल्या चिखलगाव या लहानशा खेडेगावात झाला. गंगाधरपंत व पार्वतीबाई यांनी आवडीने बाळाचे नाव 'केशव' ठेवले पण 'बाळ' या लाडक्या नावानेच त्यांची आई त्यांना हाक मारत असे. पुढे मातृसुखाला पारखे झाल्यामुळे आईने प्रेमाने ठेवलेले बाळ हेच नाव पुढे रूढ झाले व संस्मरणीय ठरले.

टिळकांना घरीच मोठे वडीलरूपी गुरू लाभले. त्यामुळे गणित आणि संस्कृत या दोन विषयात लहानपणापासूनच गोडी निर्माण झाली. त्याचे कारण इंदूताई टिळक यांनी 'लोकांचे लोकमान्य' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे गंगाधरशास्त्री लाडक्या बाळला एक संस्कृत सुभाषित शिकवीत आणि पाठ झाल्यावर १ पै. बक्षीस देत. ८ व्या वर्षी मुंज झाली तेंव्हा ही रक्कम ८०० पै. झाली होती. इतकी सुभाषिते बाळने पाठ केली होती. त्यांनी वडिलांकडे कादंबरीची मागणी केली. ती मागणी ऐकून

गंगाधरशास्त्रींना कौतुक वाटले. गंगाधरशास्त्रींनी एक अवघड गणित सोडवून दाखविण्याच्या अटीवर कादंबरी देण्याचे मान्य केले. बाळची स्वारी लगेच गणिताच्या खनपटीला बसली. बराच वेळ झगडून त्याने ते गणित बरोबर सोडवले. हे बक्षीसच त्यांच्या जीवनातील यशाची गुरूकिल्ली ठरली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

टिळक दहा वर्षाचे होते. तेंव्हा शाळा खात्यांत इन्स्पेक्टर होऊन गंगाधरशास्त्री रत्नागिरीहून पुण्याला बदली होऊन आले. तेंव्हापासून 'पुणे' हीच त्यांची कर्मभूमी ठरली. वडिलांच्या गरूकिल्लीने स्वतंत्र विचार करण्याची आणि ते स्पष्ट मांडण्याची टिळकांना लहानपणापासून सवय लागल्याने स्वावलंबन त्यांच्या हाडामाशी रूजले. संस्कृतच्या प्रेमापोटी त्या भाषेतून कविता रचणे व गणितातील बुद्धीची थट्टा समजून प्रश्नपत्रिकेतील अवघड गणित सोडविणे, स्पष्ट वक्तेपणाचा प्रत्यय म्हणून शाळेतील अभ्यासक्रमात मॉरिसनचा इतिहास एकतर्फी लिहिला असल्याचे सांगितले. या त्यांच्या बालपणाच्या व्यक्तिमत्वावरून 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीचा प्रत्यय येतो.

टिळकांची वृत्ती सडेतोड, धाडसी असल्याने कॉलेजमध्ये त्यांचा दबदबा होता. केनिलवर्थ कादंबरीतल्या 'ब्लंट' या नावाने ते कॉलेजमध्ये ओळखत. केरूनाना छत्रे व शूट या प्राध्यापकांचे टिळक आवडते विद्यार्थी होते. १८७६ मध्ये त्यांनी गणितातील बी.ए. ही पदवी व १८७८–७९ मध्ये एल. एल. बी. पदवी घेऊन वकील झाले.

देशहित महत्वाचे वाटत असल्यामुळे सरकारी नोकरी न करता देशसेवा करत देशाची तत्कालिन स्थिती सुधारण्याच्या उपायांवर टिळक नेहमी विचारविनिमय करीत. समाजसुधारणा व धर्मसुधारणा करण्यासाठीच लो. टिळकांनी शिक्षणक्षेत्रात उडी घेतली. त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' ही राष्ट्रीय विचारसरणीची शाळा काढली. त्यानंतर पुण्यात फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली.

हिंदू समाजातील अंधश्रद्धा व रूढी परंपरांचा पगडा दूर करून धार्मिक सुधारणा करायची तर सनातनी लोकांचा विरोध पत्करावाच लागतो या विचारसरणीतून आपले विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मराठीतून 'केसरी' व इंग्रजीतून 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरू केली. सरकार जनतेवर अन्याय करून अनेकविध प्रकारची बंधने लादत त्यांच्याविरूद्ध शांत न बसता टिळकांनी आपल्या हातातील लेखणीचा शस्त्रासारखा वापर करून सरकारच्या चुकीच्या धोरणावर घनाघाती टीका केली. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे!' 'पुनश्च हरिः ॐ,' देशाचे दुर्दैव व कोळसा उजळला तरी काळाच (लोकमान्यांचे अग्रलेख एस. के. कुलकर्णी, टि.म.वि. पुणे, २००७ पुणे) या अशा अनेक अग्रलेखातून सरकारवर प्रतिकार केला. त्याप्रसंगी टिळकांवर ब्रिटिशांनी राजद्रोहाचा खटला भरून त्यांना शिक्षा झाली. त्यांच्या बचावासाठी लोकांनी फंड गोळा केला. तर त्याच वेळी बाबू घोष या त्यांच्या मित्राने ब्रिटिशांजवळ दिलगीरी व्यक्त करण्याचा सल्ला दिला. परंतु मोडणार पण वाकणार नाही अशी स्वाभिमानी व बाणेदार वृत्ती असणाऱ्या टिळकांना ते पटले नाही. त्यांच्या मते राजकारणात रहायचे असेल तर अशा संकटांना सामोरे जावेच लागते. त्यांना ६ वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा म्हणून मंडालेच्या तुरूंगात ठेवण्यात आले. व १००० रू दंड झाला. तेथे ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी वेद वाङ्मय, बौद्ध धर्म तसेच जर्मन, फ्रेंच व पाली भाषांचा अभ्यास

तर केलाच शिवाय वेळेचा सदुपयोग म्हणून भगवद्गीतेचा अन्वयार्थ सांगणारा ३५० पृष्ठांचा 'गीतारहस्य' हा भाष्य ग्रंथ लिहिल्यामुळे ते नावारूपाला आले. त्यामध्ये त्यांनी गीता हचे भारतीयांचे नीतिशास्त्र असल्याचे सांगितले. प्रखर बुद्धिमत्ता, गाढ धारणा व अस्खलित स्मरणशक्ती यामुळे मराठी माणसाला समजेल अशा साध्या, सरळ व सोप्या पण रसाळ अशा मराठी भाषेत त्यांनी गीतारहस्य ग्रंथ लिहिला कारण गीतेचा कर्मयोग इंग्रजांना किंवा युरोपियनांना शिकवायचा नव्हता उलट आपलेच लोक कर्मयोगाला अंतरले होते.

लो. टिळकांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणत्याही विषयाचा अभ्यास करायचा ठरवला की ते त्या विषयाच्या मूळापर्यंत जाऊन सखोल अभ्यास करत. लो. टिळकांच्या लेखनाची सुरूवात वृत्तपत्रातील संपादकीयाने झाली असली तरी त्यांचा मूळ पिंड संशोधन करून ग्रंथ लिहिण्याचा होता. रँडचा खून झाल्यावर येरवड्याच्या तुरूंगात असताना त्यांनी 'आर्टिक होम इन द वेदाज' या ग्रंथाची निर्मिती केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून बाहेर पडल्यावर त्यांनी 'आरोयन'हा ग्रंथ लिहिला. पंचांगशोधन हा तर त्यांना आयुष्यभर पुरलेला विषय होता. पाश्चात्य देशात विद्वान पंडित म्हणून लो. टिळकांचा नावलौकिक होता. युक्तिवादकौशल्य, सडेतोड भाषा आणि अंतिम ध्येयावरची अढळ निष्ठा यामुळे त्यांचे लेखन तेजस्वी व सामर्थ्यशील बनले यात शंका नाही.

लो. टिळक एकाच वेळी धर्माचा, तत्वज्ञानाचा तसेच कायदेमंडळाचा सदस्य म्हणून काम पहात. त्याचवेळी ते सामान्य माणसाला कायद्याचा सल्लाही देत. त्यांचा राजकारणामध्येही सक्रीय सहभाग होता. त्याचप्रसंगी ते 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचे संपादकत्वही भूषवत होते. त्यांनी आपल्या कायद्याच्या ज्ञानाचा तसेच क्षमतांचा उपयोग आपल्या लेखणीच्या फटकाऱ्याने सरकारला वठणीवर आणण्यासाठी तसेच गरीब देशबांधवांची सेवा करण्यासाठी केला. अशा त्यांच्या अनेकविध क्षेत्रातील कामगिरीने आपण 'स्वयमेव मृगेंद्र' असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे लोकांनी त्यांना नेतेपद म्हणून 'लोकमान्य' ही पदवी बहाल केली. या सर्व पार्श्वभूमीवरून लोकमान्य टिळक शिक्षक, लेखक, संपादक आणि राजकीय नेते अशा त्यांच्या एकूण कार्यावरून टिळकांचे व्यक्तिमत्व अष्टावधानी होते.

**लोकमान्य टिळक यांची चतु:सूत्री**

या चतुसूत्रीमध्ये स्वराज्य या साध्याला प्राप्त करण्यासाठी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही तीन साधने आहेत. स्वराज्य – या ध्येयाचा पुरस्कार लो. टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' या जहाल अशा प्रखर शब्दात केलेला आहे. मस्वराज्याची योजना या लेखात लो. टिळक म्हणतात की, आजकालचा विषय म्हणजे स्वराज्य हा होय. स्वराज्य म्हणजे काय? हे आता बायकापोरांना सुध्दा कळू लागले आहे. बायकांना तुमच्या घरात स्वराज्य असतेच, पण बायकांना जो अधिकार घरच्या कारभारात आहे, तो सुद्धा देशाच्या कारभारात तुम्हाला नाही! देशात तुमची गुरांप्रमाणे स्थिती झाली आहे, याची तुम्हाला काही जाणीव आहे का? गोठा झाडावा मालकाने, दाणा–वैरण पहावी मालकाने, अशी गुरांची स्थिती मनुष्यपणाला शोभत नाही. अशी पारतंत्रतेची स्थिती शंभर वर्षापूर्वी नव्हती. हिंदु–मुसलमान यांची राज्ये होती. त्यावेळी कर्ते पुरूष देशात गाजत होते, पण आज तो कर्तेपणाही गेला आहे. ....... जर हिंदी लोकांना आपल्या पायावर उभे राहण्यास शिकविले तर ते साम्राज्याचे रक्षण करतील.

लो. टिळक स्वराज्याविषयी 'नोकरशाही नको' या लेखातील भाषणात स्वातंत्र्याची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात. ''एक काळ असा होता की, स्वराज्य हा शब्द उच्चारताच सरकारी अंमलदार यायचा, भीती घालायचा आणि पकडून तुरूंगात टाकायचा परमेश्वर कृपेने तो काळ गेला! आज हजारो लोकांत अधिकार वर्गांच्याच काय, पण परमेश्वराच्याही देखत 'मला स्वराज्य पाहिजे, मी ते घेणार' असे धैर्यानेच राजरोसपणे म्हणण्याचे दिवस आले आहेत.'' येथे स्वराज्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य नाही तर स्वराज्य म्हणजे स्वतःचे राज्य अपेक्षित असले तरी परराष्ट्र धोरणासारख्या काही गोष्टींबाबत साम्रज्यवादी राष्ट्राचे नियंत्रण मान्य होते. या स्वराज्याकडे जाणारा उत्क्रांतीवादी सनदशील लोकचळवळीचाच मार्ग लो. टिळकांनी प्रतिपादक केला. स्वराज्य मिळविण्यासाठी 'स्वदेशी','बहिष्कार 'व 'राष्ट्रीय' शिक्षण हे तीन मार्गच अभिप्रेत होते. अशाप्रकारे मोजक्या शब्दात ते स्वराज्याची ग्वाही देतात.

(नोकरशाही नको पृ.५५१)

**स्वदेशी**

'स्वदेशी' म्हणजे स्वदेशात तयार झालेली वस्तू वापरून स्वदेशाची आर्थिक स्थिती बळकट करणे म्हणजेच देशी आर्थिक स्वावलंबन होय. ब्रिटिशांच्या औद्योगिक व व्यापारविषयक धोरणामुळे भारताची आर्थिक स्थिती ढासळली त्यातच इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने यंत्राच्या साहाय्याने निर्माण झालेल्या वस्तू सुबक व स्वस्त होऊन त्या हिंदुस्थानात येऊ लागल्याने येथील ग्रामीण व नागर धंदे बुडाले व कारागीर बेकार झाले. त्याचा भार शेतीवर पडल्याने शेतीला आणखी अवकळा आली.

सन १८९६ मध्ये सरकारने विलायतेतून भारतात आयात होणाऱ्या सुतावरील जकात काढून टाकली व भारतातील कापड गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडावर साडेतीन टक्के जकात बसविली. मँचेस्टरच्या कापडाला उत्तेजन देण्यासाठी देशी जाड कापडावरही साडेतीन टक्के जकात बसविली. हा नवा अन्याय होता. देशी व विदेशी गिरणीवाल्यांची चढा–ओढ निर्माण होऊन संघर्षमय वातावरण निर्माण झाले. त्यावेळी कराचा भार श्रीमंतांवर पडण्याऐवजी गरीबांवर पडू लागला. त्यावळी लो. टिळकांचे पुढील उद्‌गार समर्पक आहेत. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे.' या उद्‌गारातून लो. टिळकांची गरीब जनतेविषयी असलेली आस्था व तळमळ व्यक्त होते.

अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सिलातील सभासद प्रतिकूल आहेत म्हणून रडत न बसता त्याचा प्रतिकार म्हणून सर्वांनी स्वदेशी कापड वापरले पाहिजे. पुणे, सातारा, नगर व अमरावती या ठिकाणच्या सभेत देशी कापड वापरण्याचे अठरा ठराव मंजूर झाले आणि इतर लोकंही त्यामध्ये सामील झाले. त्यावेळी लो. टिळक त्यांना मोलाचा संदेश देतात तो असा की, ''जोपर्यंत तुमच्या अंगात अशा रितीने प्रतिकार करण्याची शक्ती येत नाही तोपर्यंत तुमच्या अर्जास अथवा कायदेकौन्सिलास, तुमच्या प्रतिनिधींच्या भाषणास अगर युक्तिवादास कोणीही भीक घालणार नाही.''

स्वदेशीची कल्पना लोकहितवादींनी सर्वप्रथम मांडली. कायदेकौन्सिलातील प्रतिकारशक्तीपेक्षा लोकशक्ती प्रभावी होती. आपल्या मागणी पाठीमागे लोकसंघटनेची शक्ती तसेच या लोकसंघटनेसाठी

लोकांत व पुढाऱ्यात स्वार्थ त्यागाचे व धैर्याचे बळ जागृत असले पाहीजे. या राजकीय दृष्टीरूपी नव्या शक्तीचा जन्म १८९६–९७ मध्ये शहरातील मध्यमवर्गीयांत स्वदेशी चळवळीच्या रूपाने व खेड्यात शेतकऱ्यांच्या दुष्काळ निवारण्याच्या रूपाने होत होता. लोकशक्ती संघटीत करून तिचे धर्य व आत्मविश्वास वाढवून तिच्या आधारावर सरकारी सत्तेला शह देण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य महाराष्ट्रात जर कोणी केले तर ते म्हणजे लो. टिळकांनी होय.

सर्वांनी स्वदेशी कापड वापरणे, कापड गिरण्यांच्या कमतरतेमुळे आवश्यक त्या प्रमाणात स्वदेशी कापड तयार होणार नाही. त्यावेळी लो. टिळक म्हणतात की,सर्वच लोक काही एकदम देशी कापड वापरण्यास सुरूवात करतील असे नाही आणि स्वदेशी कापडाची मागणी वाढली की उत्पादन आपोआप वाढेल. दुसरा आक्षेप असा की, परकीय माल स्वस्त व स्वदेशी माल महाग असेल तर गिऱ्हाईक आणि राष्ट्र दोघांचेही नुकसान होते. यावर लो. टिळक म्हणतात की, स्वदेशी माल महाग असला तरी तो पैसा स्वदेशातच राहतो व भांडवलदारांच्या दृष्टीने तो उपयोगी पडतो. त्यामुळे उद्योगधंदे वाढले तरी कालांतराने वस्तूंच्या किंमती घटतात म्हणून नुकसान सोसूनही लोकांनी स्वदेशी वस्तू वापराव्यात. त्यामुळे ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळून शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कमी होईल. त्याचप्रमाणे दुष्काळाची तीव्रताही कमी होऊ शकेल. परकीय राज्यकर्ते त्यांचाच फायदा पाहण्यासाठी देशी उद्योगधंद्यांना संरक्षण देणार नाहीत तर स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी जनतेनेच स्वदेशीचा पुरस्कार केला पाहिजे. अशाप्रकारे राजकीय शस्त्र म्हणून स्वदेशीचा वापर करण्याची कल्पना सर्वप्रथम लो. टिळकांनीच मांडली. त्यांनी स्वतःसुद्धा स्वदेशीबाबत हेच व्रत स्विकारले आहे. वर्तमानपत्रासाठी स्वदेशी कागद वापरणे, पैसा फंड स्थापन करणे, अनेक देशी उद्योगांना चालना देणे, स्वदेशी वस्तूंची प्रदर्शने भरविणे व स्वदेशी सहकारी भांडारांना मदत करणे कारण स्वदेशी ही शस्त्राची एक महत्वाची बाजू होती.

**बहिष्कार**

'बहिष्कार' ही या शस्त्राची दुसरी बाजू होती. 'बहिष्कार' म्हणजे परदेशी वस्तू वापरण्याचे कटाक्षाने टाळणे होय. परिणामी विदेशी व्यापाऱ्यांना मिळणारा पैसा बंद झाला की, ते आपोआप स्वधोरणात बदल करतील. 'बहिष्कार' म्हणजे केवळ परदेशी वस्तू नाकारणे नसून सरकारच्या शासनन्याय व वसूली इ. सर्व कार्यावर बहिष्कार टाकणे कारण इंग्रज लोक येथे न येता भारतीयांच्या मदतीने भारतीयांवर राज्य करीत होते. त्यांना सहाय्य करून भारतीय लोक आपलाच नाश करीत होते म्हणून लो. टिळक त्यांना पुढील संदेश देतात. 'यापुढे तरी ब्रिटिशांना शांतता निर्माण करण्यासाठी करवसुली करण्यासाठी आम्ही सहकार्य करणार नाही. या निश्चयाने बहिष्कार नुसता शब्दात न राहता कृतीत आला पाहिजे. प्रजा जरी निःशस्त्र असली तरी निश्चय व एकजूट यामुळे ती राज्यकर्त्यास भारी होईल.'

**राष्ट्रीय शिक्षण**

ज्या शिक्षणाने भारतीय लोक मनाने आणि विचाराने भारतीय बनतील असे शिक्षण म्हणजे 'राष्ट्रीय

शिक्षण.' शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रासंबंधी योग्य ती सर्व माहिती दिली पाहिजे अशी लो. टिळक यांची राष्ट्रीय शिक्षण शिक्षणविषयक मुख्य भूमिका होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे सुरूवातीचे धोरण उदारमतवादी असले तरी पुढे भारतातील राज्यामुळे होणारे आर्थिक फायदे ध्यानात घेऊन त्यांनी त्यांचे धोरण बदलले.

शिक्षणामुळे जनतेत स्वातंत्र्य आणि हक्क यांची जाणीव निर्माण होण्याऐवजी सरकारी नोकरीसाठी आवश्यक ते शिक्षणसंस्थांकडून मिळत असे. राष्ट्राच्या प्रगतीस आवश्यक असणारे ज्ञान व कलांची माहिती त्या देऊ शकत नसत म्हणून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या पाहिजेत. त्यांनी राष्ट्राची राजकीय, औद्योगिक व सामाजिक प्रगती होईल असे शिक्षण दिले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे राजद्रोह समजला जात असल्याने, या शैक्षणिक संस्थांना सरकारी आर्थिक मदत मिळत नसे. ज्या खाजगी संस्थांना सरकारी सहाय्य मिळेल त्या संस्था लाचार झालेल्या असत. अशा शिक्षण संस्थांना लोकांच्या मदतीने स्थापन होऊन त्या शिक्षण संस्थातून राष्ट्रप्रेमाबरोबर हस्त व्यवसाय व धंदेवाईक शिक्षणाचाही समावेश असावा. कारण विद्यार्थी स्वावलंबी होऊन स्वतःचा व्यवसाय स्वतः करू शकेल. त्याला नोकरीसाठी सरकारकडे भीक मागावी लागणार नाही. शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे. इतर भाषा पूरक म्हणून शिकविल्या पाहिजेत. धार्मिक आणि सांस्कृतिक राष्ट्रीय उत्सव म्हणून लो. टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सव सुरू केला. 'राष्ट्रीय शिक्षण' या संकल्पनेत एवढा व्यापक अर्थ होता की, डेक्कन एज्युकेशन व फर्ग्युसन कॉलेजची स्थापना राष्ट्रीय शिक्षणासाठी झाली. केसरी व मराठा वृत्तपत्रातून चळवळ उभी राहिली. प्रत्यक्ष चळवळ म्हणून होमरूल चळवळ ऐक्य साधण्यासाठी ब्रिटिशांच्या 'फोडा व राज्य करा' या धोरणाला चोख उत्तर, १९०६ मुस्लिम लीगच्या स्थापनेनंतर जहालांनी राष्ट्रसभेअंतर्गत स्वतंत्र राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली.

३१ जुलैच्या रात्री आणि १ ऑगस्टच्या पहाटे लो. टिळकांची प्रकृती एकदम गंभीर झाली.

१२ वाजून ४० मि. नी लो. टिळकांचे देहावसान झाले.

स.वि. बापट यांच्या मते 'ब्रह्मर्षी ब्रह्मरूप' झाले.

या घटनेचे वर्णन अनेकविध शब्दात केलेले आढळते. तर दादासाहेब खापर्डे म्हणतात की, 'दुसरे रामदास स्वामी' गेले. शि. ल. करंदीकर यांना वाटते 'योगेश्वराचा तनुत्याग' व शेवटी अच्युत कोल्हटकर म्हणतात की 'महाराष्ट्राचे दैव फुटले' अशा अनेक उद्गारातून एक मात्र निश्चित की, लो. टिळकांच्या मृत्यूने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका युगाचा अस्त झाला आणि नव्या गांधी युगाचा उदय झाला म्हणून कर्मयोगी बरोबर युगपुरूष लोकमान्य हे शिर्षक समर्पक वाटते.

**संदर्भ टिपा**


१) इंदूताई टिळक, 'लोकांचे लोकमान्य', टिळकबंधू, पुणे, पृ. ६–७

२) एस. के. कुलकर्णी, 'लोकमान्यांचे अग्रलेख', टि.म.वि., २००७, पुणे.

३) 'स्वराज्याची मोहिम', भाग ३, पृ. ६१

४) 'नोकरशाही नको', पृ. ५५१

५) 'लोकमान्यांचे अग्रलेख', उ. नि. पृ. १८–३३

६) लोकांचे लोकमान्य, उ. नि. पृ. ६७
७) सदानंद मोरे मकर्मयोगी लोकमान्यफ, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०१४, पृ. ४४१
८) तत्रैव
९) तत्रैव
१०) तत्रैव

**संदर्भ ग्रंथसूची**


१) करंदीकर अ. ज., 'क्रांतीकारक टिळक' नि त्यांचा काळ, काळ प्रकाशन, पुणे, १९६९
२) कुलकर्णी एस. के., लोकमान्यांचे अग्रलेख, टि.म.वि., पुणे, २००७
३) केळकर न. चि., लोकमान्य टिळकांचे चरित्र, खंड १,२,३ न. चि. केळकर, पुणे, १९२३
४) ढवळे मृणालिनी (अ) लोकमान्य टिळकांची पत्रे, केसरी प्रकाशन, पुणे
५) फडके य. दि., लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक
६) फाटक न. र., लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई १९७२
७) मोरे सदानंद, कर्मयोगी लोकमान्य चिकित्सक आकलन, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१४
८) टिळक इंदूताई, 'लोकांचे लोकमान्य', टिळक बंधू, पुणे


***